Peer Reviewed International Research Journal of Geography
Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika
ISSN : 0971-6785 {Impact Factor 4.567 Renew (IIFS)} Vol. 39, No.1, Jan-June 2022. pp 97-103

# A Study of Infrastructure Serves in Primary Health Centres in Junnar Tahsil
# जुन्नर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील पायाभूत सेवा सुविधांचा अभ्यास

Sangita Bharati
Dr. Virendra Nagarale

***Abstract***

*A healthy society leads to the advancement of the country. Therefore, any country is truly prosperous only because of a healthy society. According to the World Health Organization, health is not only a body free from disease and illness but also a state of physical, mental, spiritual, and social well-being. In short, a society flourishes with mental health, emotional health, spiritual health, and physical health. Just as every individual has a responsibility to maintain good health, the government of that country also has a responsibility to improve the health of the society. Mental illness, cancer, and diseases are seen to increase. Hence it is necessary to study the availability, usability, and efficiency of the available health care facilities. As most of the population lives in rural areas in India, the quality of agriculture, education, and health services are imperative for rural areas to become self-sufficient. An attempt has been made in this research paper to study the infrastructural facilities of Primary Health Centers as well as problems of health care facilities in Junnar Taluka.*

**प्रास्ताविक :-**

आरोग्य उत्तम असलेल्या समाजाकडून देशाची उन्नती होत असते. म्हणून कोणताही देश खऱ्या अर्थाने निरोगी समाजामुळेच समर्थशील होत असतो. कोरोना काळात तर आपणास आरोग्याचे महत्त्व चांगलेच लक्षात आले आहे. आरोग्य म्हणजे शारीरिक, मानसिक, आणि सामाजिक संतुलनाची स्थिति होय. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते आरोग्य म्हणजे म क्त व्याधी आणि आजारमुक्त शरीरच नाही तर शारीरिक, मानसिक, अध्यात्मिक तसेच सामाजिकदृष्ट्या कल्याणकारी मानवी अवस्था होय. थोडक्यात मानसिक स्वास्थ, भावनिक आरोग्य, अध्यात्मिक आरोग्य, व शारीरिक आरोग्य असणाऱ्या समाजाचाच उत्कर्ष होतो. आपले आरोग्य उत्तम ठेवण्याची जबाबदारी जशी प्रत्येक व्यक्तीची आहे तशीच त्या देशातील शासनाची देखील समाजाचे आरोग्य संपन्न करण्याची जबाबदारी असते. ६ डिसेंबर ते १२ डिसेंबर १९७८ मध्ये कझाकस्तान मधील अलमार्टा (अलमा-अटा घोषणा) येथे प्राथमिक आरोग्य सेवा सुविधांबाबत भरलेल्या परिषदेत महत्वाची घोषणा करण्यात आली होती ती म्हणजे 'सन २००० पर्यंत सर्वांसाठी आरोग्य', आणि ही घोषणा जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्व सदस्य देशांनी आणि जगभरच्या सरकारने स्वीकारली होती . आरोग्य सेवांचे विकेन्द्रित नियोजनच्या संदर्भानुसार हे ध्येय अद्याप पर्यन्त दृष्टिक्षेपात आलेले दिसत नाही. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यामुळे विकसनशील देशात रोगराई वाढ होताना दिसून येते. मानसिक आजार, कॅन्सर, कोरोंना अशा आजारांमध्ये भर पडताना दिसून येते. म्हणूनच आरोग्य सेवा सुविधांची उपलब्धता, उपयोगिता आणि यशस्वीता अभ्यासणे गरजेचे आहे. भारतात ग्रामीण


भागात जास्त लोकांचे वास्तव्य असल्याने ग्रामीण भाग स्वयंपूर्ण होणेसाठी कृषि, शिक्षण आणि आरोग्य सेवा दर्जेदार असणे क्रमप्राप्त ठरते. आरोग्य सेवांबाबत विचार केला तर उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, समुदाय रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय यांमार्म त आरोग्य सेवा शासनाकडून उपलब्ध केल्या जातात. सदरच्या शोधनिबंधात जुन्नर तालुक्यातील उपलब्ध असणाऱ्या आरोग्य सुविधांचा आणि पायाभूत सुविधांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यास क्षेत्र**

अभ्यासासाठी जुन्नर तालुका निवडलेला असून तो महाराष्ट्र राज्याच्या उत्तरेकडील क्षेत्रात येतो. जुन्नर तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १९° उत्तर ते १९° २४' उत्तर असून रेखावृत्तीय विस्तार ७३°.४०' पूर्व ते ७४° १८' पूर्व असा आहे. तालुक्याच्या पश्चिमेस ठाणे जिल्हा उत्तरेस आणि पूर्वेस अहमदनगर ,दक्षिणेस आंबेगाव आणि शिरूर या तालुक्यांचा सीमा आहेत. या तालुक्यात माळशेज घाट, नाणेघाट आणि दाऱ्या घाट आहेत. जुन्नर तालुका समुद्रसपाटीपासून २२६० फुट उंचीवर आहे. जुन्नरला वनरक्षक डॉ.गिब्सन यांनी भारताचे आरोग्य केंद्र म्हटले आहे. जुन्नरमधील मोकळ्या हवेत श्वसनाचे आजार बरे होतात असे त्यांचे निरीक्षण असल्याने ब्रिटिश काळात ब्रिटिशाना जुन्नरला आराम करण्याचा सल्ला ते देत असत. जुन्नर तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १३८४५२ हेक्टर असून वनव्याप्त क्षेत्र २१३३८.२ हेक्टर आहे. तर पडीक जमीन १२७३५.२४ हेक्टर आहे. जुन्नर तालुक्याचा पश्चिम भाग डोंगराळ व आदिवासी क्षेत्राचा आहे ,मध्यभाग बागायती असून पूर्व भाग अवर्षणप्रवण आहे. जुन्नरच्या पश्चिम भागात पर्जन्य जास्त असल्याने येथे तांबूस ,मुरमाळ मृदा ,डोंगराळ भागात खडकाळ जमीन आढळते,तर मध्य भागात मध्यम आणि काळी जमीन आहे आणि पूर्व भागात मध्यम आणि हलकी जमीन आहे. जुन्नर तालुक्यात मांडवी नदी ,पुष्पावती , काळू नदी ,कुकडी व मीना नद्या आहे. शिवाय या तालुक्यामध्ये चिल्हेवाडी धरण, पिंपळगाव जोगा, माणिक डोह,येडगाव आणि वडज ही धरणे आहेत.

जुन्नर तालुक्यामध्ये तांदूळ, ज्वारी, द्राक्षे, ऊस, डाळिंब, भाजीपाला ,दूध दुभते, म ळे आणि मु ले यांची शेती केली जाते. जुन्नर तालुका हा महाराष्ट्रातील सर्वात जास्त धरणे असलेला तालुका आहे तसेच महाराष्ट्रातील पहिला पर्यटन तालुका म्हणून जुन्नर तालुका प्रसिद्ध आहे.

जुन्नर तालुक्यामध्ये लेण्याद्री व ओझर ही ,देवस्थाने, हेमाडपंथी मंदिरे, ज्ञानेश्वरमहाराज वेदप्रणित रेडा समाधी व इतर महत्वाची मंदिरे, जागतिक महादुर्बिण असलेले जी. एम. आर. टी. केंद्र आरवी येथील विक्रम उपग्रह, कृषी पर्यटन केंद्र आणि आणे येथील नैसर्गिक पूल असे अनेक महत्त्वाचे स्थळे आहेत.२०११ च्या जनगणनेनुसार जुन्नर तालुक्यातील एकूण लोकसंख्या ३९९३०२ एवढी होती. त्यामध्ये २०२३६० पुरुष होते आणि १९६९४२ स्त्रिया होत्या. २०११ च्या जनगणनेनुसार जुन्नर तालुक्यामध्ये एकूण १८३ गावे आहे व १ नगरपालिका आहे.


अभ्यासक्षेत्र
भारत
महाराष्ट्र राज्य
पुणे जिल्हा
महाराष्ट्र राज्य
पुणे जिल्हा
जुन्नर तालुका
अभ्यासक्षेत्र - जुन्नर तालुका
जुन्नर तालुका
N
0 5 10 15 20 की. मी.
73°42'E
73°48'E
73°54'E
74°0'E
74°6'E
74°12'E
74°18'E
19°30'N
19°24'N
19°18'N
19°12'N
19°6'N
19°0'N
18°54'N

## उद्दिष्टे

**१. जुन्नर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील पायाभूत सेवा सुविधांचा अभ्यास करणे.**
**२. जुन्नर तालुक्यातील आरोग्य सेवा सुविधांच्या समस्या अभ्यासणे.**

**माहिती संकलन व संशोधन पद्धती- -**

**१. प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक माहिती प्राथमिक आरोग्य केंद्राना भेटी देऊन,प्रश्नावली भरून घेऊन मिळवली.**
**२. द्वितीयक स्वरूपाची माहिती पुणे जिल्हा आर्थिक सामाजिक समालोचन,**District Census Handbook, Pune **यातून मिळवली**
**३. मिळालेली माहितीचे विश्लेषण नकाशे व सारणीपद्धतीने करून निष्कर्ष काढले.**

**विषय विवेचन-**

**पुणे जिल्ह्यातील आरोग्य सुविधा**

**पुणे जिल्ह्यामध्ये पुढील सार्वजनिक आणि शासनाच्या आरोग्य सेवा उपलब्ध आहेत. सामाजिक व आर्थिक समालोचन २०२० पुणे नुसार जिल्ह्यामध्ये ४७ रुग्णालये आहेत,५ विशेष रुग्णालये, ८८ दवाखाने आहेत. तर जिल्ह्यात ४१९ प्रसूतिगृह असून ९८ प्राथमिक केंद्र आणि ५३९ उपकेंद्र आहेत.१७६८ डॉक्टर आणि २८५५ पारिचारिका कार्यरत होत्या. पुणे जिल्ह्यात शासकीय स्तरावर आरोग्य सेवा देण्यासाठी एकुण ८४९५ खाटा होत्या. एकूणपैकी ४०५३ स्त्रियांसाठी होत्या आणि एकूणपैकी ९०३ मुलांसाठी होत्या.**

**पुणे जिल्ह्यातील खाजगी आरोग्य सुविधा**

**सामाजिक व आर्थिक समालोचन २०२० पुणे नुसार जिल्ह्यात १४२९ रुग्णालये ,४३ विशेष रुग्णालये ,६५४७ दवाखाने ५४० प्रसूतिगृह आणि एकुण खाटांची संख्या ३२५५९ होती .**

**जुन्नर तालुक्यातील आरोग्य सुविधा -**


**आर्थिक सामाजिक समालोचन २०२० नुसार जुन्नर तालुक्यात २ रुग्णालय, ५९ प्रसूतिगृह ,१२ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. तर ७४ उपकेंद्र होते. आरोग्य सेवांसाठी ३० डॉक्टर व वैद्य आणि १०१ पारिचारिका कार्यरत होत्या.**

**तालुक्यात खाजगी वैद्यकीय सुविधांची उपलब्धता – २०१९-२० मध्ये येथे ९ खाजगी रुग्णालये,०१ कॅन्सर रुग्णालय,३० दवाखाने, १२ प्रसूतिगृह आहेत.आणि रुग्णांसाठी एकूण २०९ खाटा उपलब्ध होत्या. शासकीय आणि खाजगी वैद्यकीय सेवांचा तुलना केली तर असे लक्ष्यात येते की २०१९-२० मध्ये शासकीय पातळीवर प्रसूतिगृहाची संख्या खाजगीपेक्षा जास्त आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांमार्म त रुग्णांना आरोग्य सुविधा पुरविल्या जातात.याशिवाय खाजगी दवाखाने उपलब्ध आहे.**

**जुन्नर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सुविधा – जुन्नर तालुक्यात एकुण १२ प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. त्यातील ०९ प्राथमिक आरोग्य केंद्राना क्षेत्रीय भेट देऊन माहिती मिळविली. तालुक्यातील आरोग्य सुविधा अभ्यासण्यासाठी यादृचिक पद्धतीने गावांची निवड केली.**

| पायाभूत सुविधा – | गाव | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पायाभूत सुविधा | पिंपळवडी | ओतूर | मढ | सावरगाव | आळे | आपटाळे | निमगावसावा | इंगळून | येणेरे |
| इमारत | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| स्वच्छतागृह संख्या | 3 | 1 | 5 | 4 | 1 | 1 | 4 | 0 | 1 |
| स्नानगृह | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 4 | 0 | 1 |
| स्नानगृह (सोलरसिस्टिम/ गिझरसह ) | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 1 |
| ओपीडी रूम | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| ऑपरेशन थिएटर | 1 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| प्रसूतिगृह | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| पॅथॉलॉजी लॅब | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 1 |
| शवागृह सुविधा | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| औषधालय | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| विद्युत पुरवठा(कायमस्वरूपी) | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 1 |
| पाणीपुरवठा (कायमस्वरूपी) | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 1 |
| इंटरकॉम, इमर्जन्सी अलर्ट सिस्टी’ | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 1 |
| डिजिटल सुविधा | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| रुग्णवाहिका सुविधा | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| शवविच्छेदन सुविधा | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 |
| शीतकरण सुविधा | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 1 | 1 | 0 |
| अतिदक्षता विभाग | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| रक्तपेढी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| इतर सुविधा | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| कुटूंब कल्याण कार्यक्रम | 1 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| थुंकी तपासणी | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| ट्रिपल डोस | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| प्रसूती सेवा | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| एच. आय. व्ही. तपासणी | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |

(क्षेत्रीय भेट देऊन प्राप्त झालेली माहिती )




**इमारत सुविधा –**

निवड केलेल्या सर्व गावांमधील प्राथमिक आरोग्य केंद्रांना शासनाने इमारत सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची सोय झालेली आहे. इंगळून गावातील प्रा. आ. केंद्रास इमारत आहे परंतु स्वच्छतागृह, स्नानगृह, पॅथॉलॉजी लॅब या सेवा उपलब्ध नाहीत. त्यामुळे आरोग्य केंद्रात आलेल्या रुग्णांची गैरसोय होत असल्याने शासनाने या सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. इंगळून गाव वगळता पिंपळवंडी,मढ,सावरगाव,निमगावसावा या केंद्रांमध्ये स्वच्छतागृह, स्नानगृह, पॅथॉलॉजी लॅब उपलब्ध आहे.

ओपीडी रूम,ऑपरेशन थिएटर– ओपडी रूम,प्रसूतिगृह सर्व केंद्रामध्ये उपलब्ध आहे.

**शवागृह आणि शवविच्छेदन सुविधा-**

ओतूर वगळता जुन्नर तालुक्यात शवागृहसुविधा नाही. तर शवविच्छेदन सुविधा ओतूर आणि आळे या ठिकाणी आहे. तालुक्यातील इतर प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन सुविधा नाहीत. त्यामुळे मृतांचे शवविच्छेदन करण्यासाठी वाडीवस्तीवरील आणि दुर्गम भागातून ओतूर आणि आळे येथे मृतास आणले जाते. त्यामुळे दु:खद प्रसंगी मृतांच्या नातेवाईकांच्या त्रासात आणखी भरच पडते.

**शीतकरण, विद्युत पुरवठा, पाणीपुरवठा इंटरकॉम, इमर्जन्सी अलर्ट सिस्टीम-**

काही महत्वाची औषधे, लस यांची साठवणूक करण्यासाठी शीतकरण सुविधा अत्यंत गरजेच्या असतात. उदा. कोरोंनावरील लस थोड्या कालावधीसाठीदेखील साठवणूक करण्यासाठी शीतकरण सुविधा उपलब्ध असावी लागते. कोरोंना काळात महाराष्ट्र शासनाने कोरोंनावरील लसीकरणासाठी शीतकरण किट प्राथमिक आरोग्य केंद्रात पुरविली होती. याव्यतिरिक्त इतर काळात देखील शीतकरण सुविधा गरजेची आहे. तालुक्यातील मढ,आळे

**आणि येणेरे येथे ही सुविधा उपलब्ध करून देणें गरजेचे आहे. विद्युतपुरवठा आणि पाणीपुरवठा इंगळून हे केंद्र वगळता सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपलब्ध आहे. इंटरकॉम, इमर्जन्सी अलर्ट सिस्टीम ओतूर आळे,आपटाळे येथील आरोग्य केंद्रात कार्यरत आहे.आणि डिजिटल सुविधा पिंपळवंडी,मढ ,सावरगाव या आरोग्य केंद्रात उपलब्ध नाहीत .**

**थुंकी तपासणी –** काही आजारांचे रोगनिदान करणेसाठी रुग्णाची थुंकी तपासणी करावी लागते. तालुक्यात ही सेवा उपलब्ध आहे.

**ट्रिपल डोस,प्रसूती सेवा आणि कुटूंब कल्याण कार्यक्रम** - बाल संगोपन ,ट्रिपल डोस हा कार्यक्रम तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात राबविला जातो. याबरोबरच प्रसूती सेवा देखील सर्व केंद्रामध्ये दिली जाते.

**एच.आय.व्ही. तपासणी -** एड्स हा अतिशय गंभीर आजार आहे.त्यामुळे एच.आय. व्ही. तपासणी आवश्यक झाली आहे. जुन्नर तालुक्यातील आरोग्य केंद्रात ही सुविधा उपलब्ध आहे.

**निष्कर्ष –**

जुन्नर तालुक्यातील आरोग्य सेवा सुविधाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की पायाभूत सुविधा यामध्ये वाढ होणे महत्वाचे आहे. अत्यवस्थ रुग्णास तत्पर उपचार होणेसाठी अतिदक्षता विभागाची गरज असते त्यामुळे तालुक्यात अतिदक्षता विभागाची सोय शासनाने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. याशिवाय तालुक्यात रक्तपेढीची सोय उपलब्ध करून देणे महत्वाचे आहे. वाढत्या लोकसंख्येचा विचार करून आरोग्य सेवेतील पायाभूत सुविधांमध्ये वाढ करणे गजेचे आहे त्यामुळे जुन्नर तालुक्यातील दुर्गम भागातील जनतेस याचा उपयोग होईल.

**संदर्भ:**


१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,२०२० पुणे जिल्हा
२. गजहंस दा. सु, शेजवळ सं.र.(२०१५) जालना जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवा सुविधांची उपलब्धता,Indian streams Research journal Volume-5 |Issue-8| page 1-6
३. घोरपडे योगेन्द्र आरोग्य सेवांचे विकेन्द्रित नियोजन, साथी प्रकाशन.
4. https://mr.m.wikipedia.org
5. http://www.nisargramyajunnar.in
6. LAKSHVEDH – MPSC & COMBINE youtube channel
7. महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी २०१८
8. https://arogy,maharashtra.gov.in
9. https://www.wikivillage.in



*** Smt. Sangita Bharati**
Hon. B.J ACS.College,Ale,
Tal-Junner,Dist-Pune

****Dr. Virendra Nagarale**
Professor and Head
Department of Geography
SNDT Women's University
Karve Road, Pune Campus